Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेम्बर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: 022-2278 5000. ई–मेल: investor_relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २०, सुधारित, आणि लिस्टिंग करारातील कलम ३५बी सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०८ मधील तरतुदींचा पाठपुरावा करताना, शुक्रवार दिनांक १२ जून २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता बिरला मातुश्री सभागृह, १९, नवीन मरिन लाईन्स, मुंबई – ४०० ०२० येथे होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (सभेत) मंजुर करण्याचे प्रस्तावित असलेल्या ठरावांवर मतदान करण्याचा त्यांचा अधिकार बजावण्यासाठी कंपनी आपल्या सदस्यांना सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्य सभेच्या ठिकाणाऐवजी इतर ठिकाणाहून ('दूरस्थ इ–मतदान') इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीचा उपयोग करून आपले मतदान करू शकतात. कंपनीने ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटड (''कार्वी'') यांची सेवा उपलब्ध करून घेतली आहे.

दूरस्थ ई–मतदान संबंधी आणि युजर आयडी व पासवर्ड ह्यासंबंधी पत्रव्यवहार व सभेची माहिती देणाऱ्या सूचनेची प्रत सदस्यांना पाठविण्यात आली आहे. हा पत्रव्यवहार आणि सभेची सूचना कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि कार्वी यांच्या वेबसाईटवर **https://evoting.karvy.com** येथे उपलब्ध आहे.

**दूरस्थ ई–मतदान सुविधा ८ जून २०१५ रोजी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) वाजता सुरू होईल आणि ११ जून २०१५ रोजी सायंकाळी ५.०० (भाप्रवेळ) वाजता बंद होईल. ह्या तारखेनंतर आणि वेळेनंतर दूरस्थ ई–मतदान करण्याची परवानगी नाही.**

**५ जून २०१५ ह्या अंतिम मुदतीच्या तारखेला ज्या सदस्यांचे/लाभधारकाचे नाव कंपनीच्या रजिस्टरवर असेल फक्त तेच दूरस्थ मतदानास त्याचप्रमाणे सभेच्या ठिकाणी मतदान करण्यास पात्र असतील.**

सभेची सूचना पाठविल्यानंतर एखादी व्यक्ती कंपनीची सदस्य बनल्यास आणि ५ जून २०१५ रोजी समभाग धारण करत असल्यास, त्यांनी **evoting.ril@karvy.com** येथे विनंती पाठवून यूजर आयडी आणि पासवर्ड मिळवावा. यूजर आयडी आणि पासवर्ड मिळविण्याची तपशिलवार पद्धती सभेच्या सूचनेत देण्यात आली आहे जी कंपनीच्या वेबसाईटवर आणि कार्वी याच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. जर सदस्याने कार्वी यांचेपाशी ई–मतदानासाठी अगोदरच नोंदणी केली असेल तर तो त्या युजर आयडीचा आणि पासवर्डचा उपयोग दूरस्थ मतदान करण्यासाठी करू शकतो.

ज्यांनी दूरस्थ मतदानाद्वारे त्यांचे मतदान केले असेल असे सदस्य सभेला उपस्थित राहू शकतात परंतु पुन्हा मतदान करण्यास पात्र नसतील.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे ('इन्स्टा पोल') मतदान करण्याची सुविधा सभेच्या वेळी उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी दूरस्थ ई–मतदान पद्धतीने आपले मतदान केले नाही असे सभेला उपस्थित राहणारे सदस्य सभेच्या वेळी 'इन्स्टा पोल' पद्धतीने मतदान करू शकतील.

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्यासंबंधी काही चौकशी/तक्रार असल्यास सदस्य /लाभधारक मालक खालील पत्यावर संपर्क साधू शकतील:

श्री. एस्. पी. वेणूगोपाल – डेप्यूटी जनरल मॅनेजर, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गचीबॉवली, फायनानशीयल डिस्ट्रीक्ट, नानकरामगुडा, हैद्राबाद ५०० ०३२, दूरध्वनी क्र.: ०४०–६७१६ १७००, ई–मेल: rilinvestor@karvy.com

संचालक मंडळाचे आदेशाने
सही/–
ए. अंजेनेयन
सिनियर व्हाईस प्रेसिडेंट – कॉर्पोरेट सेक्रेटरिअल

ठिकाण : मुंबई
दिनांक : २० मे, २०१५